ईश्वर टी अँण्ड नाष्टा सेंटर
संपुर्ण महाराष्ट्रातील खवैयांची आवडती चव सावेडी उपनगरातील प्रेमदानचौकात
पोहे, समोसा, शाबुदाणा खिचडी
प्रो.प्रा. ईश्वर जायभाय - 70583 88547
प्रेमदानचौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर

मनोरंजनासह प्रबोधनासाठी... दैनिक epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

पेस्ट कंट्रोल
झुरळ, डास, मुंग्या, कोळी, पाल, गोम, गोचीड, पिसवा, उंदीर, घुस, लाईटचे किडे, वाळवी, ढेकुण इ.
या सारख्या किटकांपासुन मुक्तता.
औषधाचा वास नाही, रंग नाही, साइड इफेक्ट नाही.
शिवाय घरात जास्त आवरा आवर नाही.
अपेक्स बायोटेक पेस्ट कंट्रोल
जेऊर (बा.), अहिल्यानगर.
संदीप पवार - 98 23 75 17 76

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ३२२ वा ● गुरुवार, ता. ५ जून २०२५ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००

## आरसीबीच्या विजयी मिरवणुकीत भीषण चेंगराचेंगरी : ११ जणांचा मृत्यू

### ५० हून अधिक जखमी

**बंगळूरु | प्रतिनिधी**

आयपीएल २०२५ मध्ये रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू () संघाने प्रथमच ट्रॉफी जिंकत ऐतिहासिक विजय साजरा केला. या आनंदात बुडालेल्या बंगळुरु शहरात सोमवारी संध्याकाळी काढण्यात आलेल्या विजयी मिरवणुकीत दुर्दैवी प्रकार घडला. कांतिरवा स्टेडियमपासून सुरु झालेल्या या मिरवणुकीदरम्यान चेंगराचेंगरी होऊन ११ जणांचा मृत्यू झाला असून ५० हून अधिक जण गंभीर जखमी झाले आहेत.

**उत्सवाच्या आनंदात काळोख :**

आरसीबीच्या ऐतिहासिक विजयाच्या पार्श्वभूमीवर लाखो चाहत्यांनी बंगळुरूच्या रस्त्यांवर गर्दी केली होती. कांतिरवा स्टेडियम ते एमजी रोड या मार्गावर मोठ्या प्रमाणात उत्साही चाहत्यांनी मिरवणुकीत सहभाग घेतला. संघाच्या बसचे दर्शन घेण्यासाठी आणि खेळाडूंना पाहण्यासाठी मोठ्या प्रमाणात चाहत्यांनी गर्दी केली होती.परंतु, मिरवणुकीदरम्यान काही ठिकाणी पोलिसांचा बंदोबस्त अपुरा पडल्यामुळे अफरातफर माजली. काही सेकंदांतच लोक एकमेकांवर पडू लागले. अचानक झालेल्या चेंगराचेंगरीत ११ जणांचा जागीच मृत्यू झाला, तर ५० हून अधिक जण जखमी झाले आहेत. त्यातील काहींची प्रकृती चिंताजनक असल्याचे रुग्णालय सूत्रांनी सांगितले.

**प्रशासनाची गाफिल भूमिका ?**

या घटनेनंतर पोलिस आणि महानगरपालिका प्रशासनाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात गर्दी होणार असल्याचे माहिती असूनही योग्य नियोजन का करण्यात आले नाही? असा सवाल सोशल मीडियावर विचारला जात आहे. मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी या दुर्घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त करत मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी १० लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. तसेच या दुर्घटनेची चौकशीसाठी विशेष समिती गठित करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

**संघाकडून शोक व्यक्त :**

आरसीबी संघाने सोशल मीडियावर पोस्ट करत या दुर्दैवी घटनेबद्दल दुःख व्यक्त केले आहे. "विजयाचा आनंद साजरा करत असताना आपल्यातील काही सदस्य गमावले, हे अत्यंत वेदनादायक आहे. आम्ही त्यांच्या कुटुंबीयांच्या पाठीशी आहोत," असे संघाकडून सांगण्यात आले. क्रीडाविजयाचे सेलिब्रेशन हे आनंदाचे कारण असते. पण नियोजनाचा अभाव आणि अनियंत्रित गर्दीचा फटका अनेक निरपराध नागरिकांच्या जीवावर उठतो, हे अत्यंत दुर्दैवी आहे. प्रशासनाने अशा घटना टाळण्यासाठी अधिक काटेकोर आणि संवेदनशील नियोजन करणे अत्यावश्यक आहे.

## ठाणे-घोडबंदर बोगदा प्रकल्प भ्रष्टाचाराला 'सर्वोच्च' चपराक

**नवी मुंबई | प्रतिनिधी**

ठाणे-घोडबंदर बोगदा आणि उन्नत मार्ग प्रकल्पाच्या निविदा प्रक्रियेत पारदर्शकतेचा अभाव, पात्र कंपनीची वगळणी, आणि सुमारे ३ हजार कोटींनी वाढवलेली प्रकल्प किंमत. या सर्व प्रकरणावर सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट भूमिका घेत एमएमआरडीएला चपराक दिली.

यामुळे अखेर एमएमआरडीएला ही निविदा रद्द करावी लागली. प्रकल्पाच्या मूळ निविदेत एल अँड टी या दर्जेदार, अनुभवी आणि आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या कंपनीला अपात्र ठरवण्यात आले होते, तर निविदा मेघा इंजिनियरिंग कंपनीकडे झुकवण्यात आली होती. हे प्रकरण न्यायप्रविष्ट झाल्यानंतर, उच्च न्यायालयाने सरकारच्या बाजूने निर्णय दिला, मात्र सर्वोच्च न्यायालयाने तो निर्णय पलटवत प्रकल्पात ३ हजार कोटींची बचत करत नव्याने प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश दिले. सुधीर लक्ष्मीकांत दाणी (बेलापूर, नवी मुंबई) यांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना केवळ एमएमआरडीएच नव्हे तर केंद्र व राज्य सरकारच्या भ्रष्टाचारविरोधी घोषणांनाही तडा देणारी आहे.

"सबका साथ, सबका विकास" म्हणणाऱ्या सरकारच्या धोरणातच निविदा प्रक्रिया अपारदर्शक ठेवून सत्ताधाऱ्यांच्या जवळच्या कंपन्यांना फायदा देण्याचा स्पष्ट प्रयत्न दिसतो, असा आरोप त्यांनी केला. एल अँड टीची याचिका जर सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली असती, तर तब्बल ३ हजार कोटी रुपयांचा अतिरिक्त भार करदात्यांवर पडला असता, हेही त्यांनी अधोरेखित केले. सरकारच्या डीएसआर रेट्सचा उल्लेख करत दाणी म्हणाले की, बाजारभावाच्या कितीतरी पटीने अधिक दर ठरवले जातात, ज्यातून अधिकृत भ्रष्टाचारालाच खतपाणी दिले जाते. यावरून सरकार आणि एमएमआरडीएचा हेतू स्पष्ट होतो, असा आरोप त्यांनी केला. दाणी यांच्या मते, सरकारने भ्रष्टाचार निर्मूलनाचे ठोस पावले उचलली नाहीत, तर नागरिकांनी पुढील निवडणुकांमध्ये डोळसपणे मतदान करून चुकीच्या शासनकर्त्यांचे निर्मूलन करावे, हा एकमेव मार्ग उरतो.

## श्रेया देसाई नौदलात लेफ्टनंटपदावर विराजमान

### खा. शाहू महाराजांचे मार्गदर्शन ठरले प्रेरणादायी



**कोल्हापूर | प्रतिनिधी**

गडहिंग्लज तालुक्यातील नेसरी गावाची कन्या श्रेया मिलिंद देसाई हिने भारतीय नौदलात थेट लेफ्टनंट पदावर निवड होण्याचा मान मिळवला असून, ही घटना संपूर्ण कोल्हापूर जिल्ह्यासाठी अभिमानास्पद आणि प्रेरणादायी आहे. श्रेया हिने कोल्हापूर येथील न्यू पॅलेस परिसरातील छत्रपती शाहू विद्यालयात शिक्षण घेतले. तिच्या शालेय जीवनातच ती 'Tara Commando Force (TCF)' या खास सैनिकी प्रशिक्षण योजनेचा सक्रिय भाग होती. १९९८ साली खासदार छत्रपती शाहू महाराज यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या या उपक्रमाचा उद्देश मुलींना शारीरिक, मानसिक, बौद्धिक व नैतिक दृष्ट्या सक्षम करून संरक्षण दलांमध्ये सेवा देण्यासाठी तयार करणे हा आहे. खासदार शाहू छत्रपती महाराज यांचे वेळोवेळी मिळालेले मार्गदर्शन आणि सहभाग विद्यार्थिनींसाठी कायम प्रेरणादायी ठरले आहे. या सशक्त पार्श्वभूमीमुळेच श्रेया देसाईसारख्या विद्यार्थिनी आज देशाच्या संरक्षणासाठी पुढे सरसावलेल्या दिसत आहेत. श्रेया देसाई हिचे सर्वत्र हार्दिक अभिनंदन होत आहे तिला भविष्यासाठी अनेकजणांनी शुभेच्छा दिल्या. तिच्या यशामुळे नेसरी गाव, कोल्हापूर जिल्हा आणि संपूर्ण महाराष्ट्राला अभिमान वाटतो आहे.

## वनहक्क कायदा १० हजार दावे १९ डिसेंबरपर्यंत मार्गी लावणार- मुख्यमंत्री

**पणजी | प्रतिनिधी**

गोवा राज्य सरकारने आदिवासी समुहाच्या प्रश्नांकडे विशेष लक्ष देणे सुरू केले असून वनहक्क कायद्याखालील सुमारे १० हजार प्रकरणे १९ डिसेंबरपर्यंत निकाली काढण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यासाठी प्रशासन युद्धपातळीवर प्रयत्नशील आहे. या मोहिमेद्वारे योग्य लाभार्थ्यांना न्याय देणे व गैरफायदे रोखणे असा मुख्य उद्देश आहे. वन हक्क कायद्याखालील अंदाजे १० हजार प्रलंबित दाव्यांचा निपटारा करण्यासाठी खुद्द मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी लक्ष घातले असून काल मंत्रालयात उच्चस्तरीय बैठक घेऊन १९ डिसेंबरपर्यंत सर्व खासगी वनहक्क प्रकरणांचा निपटारा करण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी १४ जूनला विशेष शिबिर घेण्यात येईल. ता. १८ जून रोजी जिल्हाधिकाऱ्यांकडून प्रलंबित अर्जावर अंतिम निर्णय घेतला जाणार आहे. या बैठकीनंतर घेतलेल्या पत्रकार परिषदेत मुख्यमंत्र्यांनी या निर्णयाची माहिती दिली. १८ जून रोजी अंतिम निर्णय होणार : या प्रक्रियेत पुढील टप्पा म्हणून १८ जून रोजी सर्व जिल्हाधिकाऱ्यांकडून प्रलंबित प्रकरणांवर अंतिम निर्णय घेण्यात येणार आहे. सध्या एकूण १० हजार ५०० अर्जांपैकी ८७१ प्रकरणांचा निपटारा झाला असून, ९४९ अर्ज वनक्षेत्र नसल्यामुळे फेटाळण्यात आले आहेत. यावेळी सावंत यांनी सांगितले, उर्वरित खासगी वन हक्क दाव्यांचा पूर्ण निपटारा १९ डिसेंबर २०२५ पूर्वी करण्यात येणार आहे. त्याअंतर्गत प्रलंबित अर्जांची प्रक्रिया गतीने मार्गी लावण्यासाठी १४ जून रोजी उपजिल्हाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील सहा तालुक्यांमध्ये विशेष शिबिर भरविण्यात येणार आहेत.



## महिला आयोग कार्यपद्धतीसाठी धोरणात्मक नियोजन आवश्यक- डॉ.गोऱ्हे

### महिला न्यायासाठी आयोगाची दिशा ठरवणारा 'संवाद'!

**मुंबई | प्रतिनिधी**


महिलांच्या हक्कांचे संरक्षण, सबलीकरण व न्यायासाठी महाराष्ट्र राज्य महिला आयोग जे कार्य करत आहे, ते भविष्यात अधिक प्रभावी व्हावे यासाठी आयोगाने आता धोरणात्मक नियोजन करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केले. महाराष्ट्र विधिमंडळ उपसभापती कार्यालय व राज्य महिला आयोगाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'महिला आयोग : कार्यपद्धती व कार्यक्षमतेवर संवाद' या विशेष कार्यक्रमात त्या बोलत होत्या. या संवादात महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर, आमदार चित्रा वाघ, प्रज्ञा सातव, सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांच्यासह अनेक माजी अध्यक्ष व महिला प्रतिनिधींनी सहभाग घेतला. महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, "वन स्टॉप सेंटर्स" या केंद्रांची जबाबदारी आता 'एनजीओ'कडून राज्य शासनाकडे येणार असून, केंद्रांच्या संख्येत लक्षणीय वाढ करण्यात येणार आहे. महिलांच्या प्रश्नावर अधिक परिणामकारक उपाययोजना राबविण्यासाठी आयोगाची कार्यपद्धती सशक्त होणे काळाची गरज असल्याचे या कार्यक्रमात अधोरेखित करण्यात आले.

## जातीनिहाय जनगणनेची घोषणा

### १ मार्च २०२७ पासून देशभरात जनगणना सुरू

**नवी दिल्ली | प्रतिनिधी**

देशातील प्रदीर्घ काळापासून रखडलेली जनगणना अखेर सुरू होण्याच्या मार्गावर आहे. केंद्र सरकारने यासंदर्भात मोठी घोषणा करत १ मार्च २०२७ पासून जनगणना सुरू होणार असल्याचे जाहीर केले आहे. विशेष म्हणजे, यावेळी होणारी ही जनगणना जातीनिहाय (caste-based) पद्धतीने केली जाणार आहे, अशी अधिकृत माहिती सरकारने दिली आहे. जनगणना ही भारतातील सामाजिक, आर्थिक आणि प्रशासनिक धोरणांसाठी अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया आहे. मात्र, २०२१ मध्ये होणारी जनगणना कोरोनामुळे पुढे ढकलण्यात आली होती. त्यानंतर भारतीय कम्युनिस्ट पक्षासह अनेक राजकीय पक्षांनी जातीनिहाय जनगणनेची मागणी केली होती. आता केंद्राने ही मागणी मान्य करत ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.जातीनिहाय जनगणना केल्याने देशातील विविध जातीसमूहांची अचूक लोकसंख्या व त्यांच्या सामाजिक-आर्थिक स्थितीचे निदर्शनास येणार असून, भविष्यातील धोरण आखणं सोपं होणार असल्याचे सांगण्यात येते. सरकारच्या या निर्णयाचे विविध स्तरांतून स्वागत होत असून, काही ठिकाणी राजकीय चर्चा आणि संभाव्य परिणामांवरून वादविवादही सुरू झाले आहेत. तरीदेखील, २०२७ ची जनगणना सामाजिक न्यायाच्या दृष्टीने मैलाचा दगड ठरणार, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.




## We, The Puffcorns of India लघुपट चित्रभारतीमध्ये बेस्ट फिल्म – ज्युरी मेंशन पुरस्कार

**मुंबई | प्रतिनिधी**

We, The Puffcorns of India या लघुपटाने चित्रभारती शॉर्ट फिल्म फेस्टिव्हल २०२५ मध्ये आपली वेगळी छाप पाडत 'बेस्ट फिल्म – ज्युरी मेंशन' हा प्रतिष्ठेचा पुरस्कार पटकावला. आदित्य मुंडे दिग्दर्शित या लघुपटाचे यश संपूर्ण टीमसाठी अभिमानास्पद ठरले आहे. प्रभात चित्र मंडळ, यशवंतराव चव्हाण केंद्र, रोटरी क्लब ऑफ ठाणे एसेस यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या या फिल्म फेस्टिव्हलमध्ये विविध राज्यांतील उत्कृष्ट लघुपटांचा समावेश होता. परीक्षक मंडळातर्फे चित्रपटाच्या विषय, मांडणी व कलात्मक गुणवत्तेची दखल घेत हा पुरस्कार देण्यात आला.पुरस्कार वितरण समारंभात वैभव खिस्ती, विकास पाटील, डॉ. संतोष पाठारे, प्रभात चित्र मंडळाचे अध्यक्ष किरण शांताराम आदी मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. लघुपटाच्या टीममध्ये निखिल शिंदे, अभिजीत दळवी, प्रविण खाडे, तसेच इतर सहकारी कलावंतांनी महत्त्वाची भूमिका बजावली. वैष्णवी घोडके आणि हरीश बारस्कर यांच्या प्रभावी अभिनयालाही प्रेक्षकांनी विशेष पसंती दर्शवली.



## मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते विधी विधानच्या बोधचिन्हाचे अनावरण व ग्रंथ प्रकाशन

### महाराष्ट्राच्या कायदेविषयक प्रगतीचा गौरव

**मुंबई | प्रतिनिधी**

महाराष्ट्र हे देशाच्या प्रगतीच्या प्रत्येक क्षेत्रात अग्रगण्य राज्य आहे. लोकोपयोगी कायदेनिर्मितीमध्येही राज्य इतर राज्यांच्या पुढे असून, अनेक देशांनी महाराष्ट्राच्या कायद्यांचे अनुकरण केले असल्याचे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले.

विधी व न्याय विभागाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित विशेष कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते विधि विधान शाखेच्या नवीन बोधचिन्हाचे अनावरण तसेच पाच महत्त्वपूर्ण ग्रंथांचे प्रकाशन करण्यात आले.

या कार्यक्रमात उपमुख्यमंत्री अजित पवार, विधी व न्याय विभागाचे राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, मुख्य सचिव सुजाता सौनिक, प्रधान सचिव सुवर्णा केवले आदी मान्यवरांची उपस्थिती होती. मुख्यमंत्र्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "राज्याच्या कायद्यांमधील सुस्पष्टता, पारदर्शकता व जनहित लक्षात घेऊन देशातील इतर राज्यांनी महाराष्ट्राच्या वाटचालीचा आदर्श घ्यावा, हे महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद आहे."



# कचरावेचकांना मार्गदर्शन; मनपाचा उपक्रम

## विविध कल्याणकारी योजनांची माहिती

**अहमदनगर । प्रतिनिधी**

शहर स्वच्छ ठेवण्यासाठी सतत झटणाऱ्या कचरावेचकांचे आरोग्य व सुरक्षितता अबाधित रहावे, यासाठी अहिल्यानगर महापालिकेच्या वतीने शहरातील कचरावेचकांसाठी विशेष प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिराला कचरावेचकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमात कचरावेचकांना निरोगी आरोग्य राखण्यासाठी आवश्यक खबरदारी, विविध आजारांपासून बचावाचे उपाय, उपचारासाठी असलेल्या योजना तसेच केंद्रशासनाच्या नमस्ते योजना व अन्य कल्याणकारी योजनांची माहिती देण्यात आली. शिबिरात अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था संघटक रमजान अली रंगरेज यांनी प्रत्यक्ष कचरा गोळा करताना घ्यावयाची काळजी, हातमोजे, मास्क, सॅनिटायझर वापराचे महत्त्व याबाबत प्रात्यक्षिकांसह माहिती दिली. उतारवयात होणाऱ्या आजारांपासून बचाव, शारीरिक तंदुरुस्ती राखण्याचे उपाय यावरही विशेष मार्गदर्शन केले. केंद्र शासनाच्या नमस्ते योजनेच्या माध्यमातून कचरावेचकांची नोंदणी सुरू आहे. या योजनेतून त्यांना रोजगार, विमा, आरोग्य तपासण्या, औषधोपचार व सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ मिळणार असल्याची माहिती देण्यात आली. यावेळी महापालिकेच्या घनकचरा विभागाचे लांडगे व कष्टकरी पंचायतचे जिल्हा समन्वयक विकास उडानशिवे, विकास धाडगे, मनोहर चखाले, विकास वाल्हेकर, सागर खुडे, रोहन साबळे, काळू खुडे आदींसह कचरा वेचक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिबिराच्या आयोजनात महापालिका आयुक्त यशवंत डांगे, उपायुक्त संतोष टेंगले, सहाय्यक आयुक्त सपनाबेन वासवा, घनकचरा व्यवस्थापन प्रमुख अशोक साबळे, तसेच माजी नगरसेवक व कागद काच पत्रा कष्टकरी पंचायतचे अध्यक्ष भाऊसाहेब उडानशिवे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

> **कचरावेचक हे शहराच्या स्वच्छतेचे खरे शिल्पकार आहेत. त्यांचे आरोग्य हे समाजाच्या आरोग्याशी जोडलेले आहे. अनेकदा हे काम धोकादायक ठरू शकते, त्यामुळे त्यांना योग्य मार्गदर्शन, सुरक्षित साधनसामग्री व आरोग्य सुविधा मिळणे गरजेचे आहे. महापालिकेच्या सहकार्याने आम्ही अधिकाधिक कचरावेचकांपर्यंत या योजनांचा लाभ पोहोचवण्याचा संकल्प आहे.**
>
> **विकास उडानशिवे,** समन्वयक, कष्टकरी पंचायत



# यशासाठी सातत्य, शिस्त आणि चिकाटी महत्त्वाची- कवडे

## महसूल सहाय्यकपदी शिरसाठ हिची निवड

**अहमदनगर । प्रतिनिधी**

शहरातील तरुणांनी शासकीय सेवेत यावे, ही वेळेची गरज आहे. श्रावणी शिरसाठ हिने सातत्य, शिस्त आणि चिकाटीच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. तिच्या या यशामुळे इतर तरुण-तरुणींनाही प्रेरणा मिळेल, असे प्रतिपादन माजी स्थायी समिती सभापती गणेश कवडे यांनी केले. मुंबई येथे महसूल सहाय्यक पदावर निवड झाल्याबद्दल श्रावणी जितेंद्र शिरसाठ हिचा माजी स्थायी समिती सभापती गणेश कवडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी मेजर सुनील कवडे, रघुनाथ लांडे, राजेंद्र शिरसाठ, आप्पा वाघमारे, अरुण दाते, कानिफनाथ शिंदे, महेंद्र शिरसाठ, राजेंद्र येंडे, जितेंद्र शिरसाठ आदी मान्यवर उपस्थित होते.पुढे बोलताना गणेश कवडे म्हणाले की, स्पर्धा परीक्षांतून शासकीय सेवा मिळवणे सोपे नाही, परंतु योग्य दिशा, अभ्यास आणि इच्छाशक्ती असेल तर यश निश्चित असते. श्रावणीने तिच्या अभ्यासू वृत्तीने हे सिद्ध करून दाखवले. तिच्या पुढील वाटचालीसाठी माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा आहेत. सत्काराला उत्तर देताना श्रावणी शिरसाठ म्हणाली की हा सन्मान माझ्या मेहनतीचे प्रतीक आहे. माझ्या यशामागे माझ्या पालकांचे पाठबळ, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि स्वतःचा सातत्यपूर्ण प्रयत्न आहे. मी सर्वांचे आभार मानते. स्पर्धा परीक्षा कठीण असल्या तरी सकारात्मक दृष्टिकोन, नियमित अभ्यास आणि योग्य मार्गदर्शन असल्यास कोणतेही ध्येय गाठता येते. माझ्या पदाचा उपयोग मी समाजसेवा आणि जनतेच्या हितासाठी करीन. आजचा सत्कार मला पुढील वाटचालीसाठी बळ देणारा आहे.



# क्रिएटिव्ह टॅलेंट समर कॅम्पचा उत्साही समारोप

**अहमदनगर । विजय मते**

शहरातील सावेडी उपनगरामध्ये गेल्या पंधरा वर्षांपासून स्नेहालयच्या उडान प्रकल्प आणि युवा सोशल सामाजिक बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने आयोजित केला जाणारा 'क्रिएटिव्ह टॅलेंट समर कॅम्प' यंदाही २०२५ मध्ये उत्साहात पार पडला. सावेडी उपनगरासह शहरातील विविध भागांतील बालकांनी या ११ दिवसांच्या कॅम्पमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या समर कॅम्पचा समारोप सोहळा चेतना लॉन, छत्रपती संभाजीनगर रोड येथे मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बाळासाहेब पवार होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आकाश त्रंबके, विजय साबळे, प्रवीण कदम, महेश सूर्यवंशी, संदीप क्षीरसागर, नितीन वावरे, गौरव राऊत, योगीराज धामणे, माजी नगरसेवक विनीत पाऊलबुद्धे, रूपाली वारे, भाऊसाहेब गोंधळी (अध्यक्ष, समर्पण सेवा फाऊंडेशन), विनोद सापा (महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती), तन्वी मांढरे (ओम नाद संगीत विद्यालय) यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमादरम्यान बाळासाहेब देशमुख यांच्या संकल्पनेतून वृक्ष संवर्धन आणि प्लास्टिक मुक्त भारत या विषयावर आधारित 'गणपती बाप्पा मोरया' ही प्रभावी एकांकिका सादर करण्यात आली. याशिवाय, स्नेहालय संस्थेच्या विद्यार्थ्यांनी संगीता सानप यांच्या मार्गदर्शनाखाली नाट्यप्रयोगही सादर केला. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी देविदास गुडा, भाऊसाहेब बडे, राजेंद्र नागुल, ओम दोता, संदीप करोलिया, भाऊसाहेब गोधळी, रेश्मा पवने, जगदीश सांगळे, समीक्षा रचा, प्रज्ञा अष्टेकर, श्वेता जाधव, साक्षी जाधव, समर्थ खोमणे, शिवम गायकवाड, राजवीर कुडीया यांनी विशेष मेहनत घेतली.गेल्या १० वर्षांपासून या कॅम्पचे सातत्याने आयोजन करणारे आणि सामाजिक कार्यात अग्रेसर असलेले योगेश पिंपळे यांचे विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन लाभले. समर कॅम्पमधून बालकांच्या कलागुणांना बहर मिळाल्याने पालक आणि उपस्थित मान्यवरांनी आयोजकांचे मन:पूर्वक कौतुक केले.

# पुरातत्व विभागाच्या दुर्लक्षामुळे ऐतिहासिक वारसा संकटात

**अहमदनगर । आबीद खान**

नुकताच अहमदनगर शहराचा ५३५ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. मात्र, या ऐतिहासिक दिवसाच्या निमित्ताने शहराचे संस्थापक अहमद निजामशहा यांच्या मजारस्थळी ना जिल्हाधिकारी आले, ना महापालिकेचे आयुक्त, तसेच पुरातत्व विभागाचा कोणताही वरिष्ठ अधिकारीही हजर नव्हता, ही बाब अत्यंत खेदजनक आहे. या स्थळी जाण्यासाठी सध्या योग्य रस्ताही उपलब्ध नाही. ऐतिहासिक वारशाच्या संवर्धनाबाबत प्रशासन व पुरातत्व विभागाचे दुर्लक्ष सातत्याने दिसून येते आहे. शहरातील अन्य अनेक ऐतिहासिक वास्तूंचीही दुरवस्था झालेली असून, त्यांचे तातडीने जतन करणे गरजेचे आहे.नेअमतखानी गेटच्या आजूबाजूला दारू व गांजाचे सेवन करणाऱ्यांचे वावर वाढले असून, या परिसरात सार्वजनिक स्वच्छतेचाही अभाव आहे. गेटजवळील परिसरात खुलेआम गैरवर्तन होत असून, याकडे पुरातत्व विभागाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याची तक्रार आहे. नेअमतखानी गेटची दुरुस्ती तातडीने करण्यात यावी, तसेच बागरोजा व फराहबाग येथील इमारतींचेही त्वरित संरक्षण व देखभाल करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या वास्तूंपर्यंत जाण्यासाठी रस्ते उपलब्ध करून देणेही अत्यंत आवश्यक आहे. या मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष न दिल्यास समाजवादी पार्टी अहमदनगरच्या वतीने ता. १२ जून २०२५ रोजी अहमदनगर पुरातत्व कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करण्यात येईल, असा इशारा शहर जिल्हाध्यक्ष आबीद हुसैन यांनी दिला आहे. यासंदर्भात त्यांनी जिल्हाधिकारी अहमदनगर यांना निवेदन दिले असून, याची प्रत संरक्षण सहाय्यक, पुरातत्व विभाग, अहमदनगर यांनाही पाठविण्यात आली आहे.



# मनपा प्रशासनाचा भोंगळा कारभार

## नुकताच बनवलेला रस्ता कुठलीही विनापरवानगी खोदला

**अहमदनगर । प्रतिनिधी**

रेल्वे स्टेशन भेवरी चाळ गवळीवाडा येथे माजी नगरसेवक विजय गव्हाळे यांनी आमदार संग्राम जगताप यांच्या निधीतून सहा महिन्यापूर्वी संपूर्ण रस्ता काँक्रिटीकरण केला.

तेव्हा महापालिकेच्या पाणीपुरवठा विभाग व इतर विभागाने जमिनीखालचे कामे केलेली होती व आता पूर्ण झालेल्या रस्ता अचानक पणे कुठलीही परवानगी न घेता रस्ता खोदण्यात आला या अशा मनपा प्रशासनाच्या भोंगळ्या कारभारामुळे रस्त्याचे विद्रूपीकरण होत आहे. याला थांबवण्यासाठी प्रशासनाने कारवाई करण्यात यावी व रस्ते होण्यापूर्वीच कामे पूर्ण करण्यात यावी.



**शहरांमध्ये सध्या आमदार संग्राम जगताप यांच्या निधीतून शहरांमध्ये विकास होत आहे व हे रस्ते पूर्ण तत्वावर झाले की मनपा प्रशासनाच्या पाणीपुरवठा विभाग हा रस्ता खोदून पाईपलाईनचे काम करते मात्र या रस्त्याचे विद्रूपीकरण होऊन मोठ्या खड्ड्यात रूपांतर होते यामध्ये कोणतीही दुर्घटना घडते त्यामुळे रस्ता होण्यापूर्वी मनपा प्रशासनाने कामे पूर्ण करावी व जिथे रस्ता खोदण्यात येईल तेथे रस्ता बनवून देण्याची मागणी माजी नगरसेवक विजय गव्हाळे यांनी केली आहे.**

# मनपाची जिल्हाधिकाऱ्यांनी घेतली झाडाझडती



**अहमदनगर । प्रतिनिधी**

महानगरपालिकेच्या विविध विभागांची आढावा बैठक जिल्हाधिकारी तथा प्रभारी महापालिका आयुक्त पंकज आशिया यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच पार पडली. या बैठकीत त्यांनी सर्वच विभाग प्रमुखांकडून चालू असलेल्या योजनांची व प्रकल्पांची सविस्तर माहिती घेतली. बैठकीदरम्यान, पंकज आशिया यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, नागरिकांना महापालिकेच्या माध्यमातून मूलभूत सुविधा तातडीने आणि प्रभावी पद्धतीने मिळणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे प्रत्येक विभागाने आपल्या कार्यपद्धतीत सुधारणा करणे गरजेचे आहे. महानगरपालिकेची जबाबदारी केवळ विकास कामे करणे इतकीच नाही, तर ती कामे वेळेत आणि दर्जेदार रितीने पूर्ण होणे ही देखील तितकीच महत्त्वाची आहे. विभाग प्रमुखांना सूचना देत असताना सांघितले की, नागरिकांच्या समस्या ऐकून त्यावर त्वरित कृती केली जावी. असे आदेश जिल्हाधिकारी तथा आयुक्त पंकज आशिया यांनी यावेळी दिली. यावेळी आरोग्य, जलपुरवठा, स्वच्छता, बांधकाम, करसंकलन, विद्युत, बागकाम, नागरी सुविधा, मालमत्ता व्यवस्थापन, वसुली, शिक्षण आदी विभागांतील कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. प्रत्येक विभाग प्रमुखांनी आपापल्या क्षेत्रातील प्रगती अहवाल सादर करताना येणाऱ्या अडचणी व पुढील उपाययोजना देखील मांडल्या. जिल्हाधिकारी आशिया यांनी स्पष्ट निर्देश दिले की, कामांमध्ये पारदर्शकता आणि गती येणे आवश्यक आहे. नागरिकांची सेवा हीच आपली सर्वोच्च प्राधान्यक्रम असावी. त्यामुळे प्रत्येकाने आपली जबाबदारी पूर्ण निष्ठेने पार पाडावी. या बैठकित उपायुक्त विजय मुंढे, डॉ.संतोष टेंगळे, सहायक आयुक्त सपना वसावा, निखिल फराटे, जल अभियंता परिमल निकम, आस्थापणा विभाग प्रमुख मेहेर लहारे, शहर अभियंता मनोज पारखे, श्रीकांत निंबाळकर, अतिक्रमण विभाग प्रमुख सुरेश इथापे, घनकचरा विभाग प्रमुख अशोक साबळे, प्रसिध्दी अधिकारी शशिकांत नजन, संगणक विभाग प्रमुख अंबादास साळी, सर्व प्रभाग अधिकारी आणि विभाग प्रमुख आदी उपस्थित होते.


## रयत समाचार Classified छोटी जाहिरात

### छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक

**भाड्याने देणे**
परिचय हॉटेलजवळ, बालिकाश्रम रोडवर कॉर्पोरेट ऑफिस, बँक, शोरूम, क्लिनिक आदींसाठी ८०० स्क्वेअर फुटाचे दोन मजले बांधलेली जागा भाड्याने देणे आहे.
**- संपर्क -**
**८८८८३४७४११**

निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.



**मे. रुपाली एजन्सी**
फुड प्रॉडक्ट मटेरियल सप्लायर्स
राधिका लॉजजवळ, तापकीर लेन, आडत बाजार, अहमदनगर - ४१४००१.
(०२४१) २३४३०६०, ९८२२८४३०६०
ई-मेल - rupaliagency@gmail.com

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
**जगदंबा टी सेंटर**
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

**सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा**


हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com **(वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)**

# सोयीसुविधा वाढवताना मूळ रचना अबाधित ठेवूनच कामे व्हावीत- भिल्लारे

## अभियोग संचालनालय संचालक भिल्लारे यांची मोहटा देवस्थानास भेट

**पाथर्डी । प्रतिनिधी**

श्री क्षेत्र मोहटा देवीचे स्थान अत्यंत जागृत,निसर्गरम्य परिसराने नटलेले असून येथील प्रेरणादायी ऊर्जा सकारात्मकता वाढवते. राज्यातील प्रमुख देवस्थानांपैकी मोहटा देवस्थान नावारूपाला आले आहे, असे मत राज्याचे अभियोग संचालनालयाचे संचालक अशोक कुमार भिल्लारे यांनी व्यक्त केले. संचालक पदावर नियुक्ती झाल्यानंतर प्रथमच भिलारे यांनी मोहटा देवस्थानला भेट दिली. यापूर्वी ते पाथर्डी येथे दिवाणी न्यायाधीश असताना देवस्थानचे विश्वस्त तर जिल्हा न्यायाधीश असताना अध्यक्षपदावर त्यांनी काम केले आहे.यावेळी अस्मिता भिलारे,प्राचार्य डॉ. विलास भिलारे यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे,जनसंपर्क अधिकारी भीमराव खाडे,देवस्थानचे पुरोहित बाळासाहेब क्षीरसागर आदींनी स्वागत केले.



भिल्लारे म्हणाले, राज्यातील साडेतीन शक्ती पिठांच्या बरोबरीने मोहटा देवस्थानचे महात्म्य वाढत असून राज्याच्या कानाकोपऱ्यातून येथे मोठ्या संख्येने भाविक येतात. शासनाच्या विविध विकास निधीतून विकासकामे वेगाने सुरू असून परिसराचे वातावरण व स्थान महात्म्य बघता गर्दी गोंगाटापासून दूर राहत आध्यात्मिक शक्तीची अनुभूती घेण्यासाठी येणाऱ्या काळात भाविकांचा ओढा येथे अधिक वाढणार आहे देवस्थान समितीकडून विकास कामांबरोबरच भाविकांसाठी दैनंदिन सुविधा देण्यावर विशेष लक्ष दिले जात असल्याने भाविकांचेही समाधान होते. येथील स्थान महात्म्य मोठे असल्याने येणाऱ्या भाविकाला हमखास प्रचिती येते.धार्मिक व निसर्ग पर्यटनाच्या दृष्टीने अहिल्यानगर जिल्ह्यातील प्रमुख तीर्थक्षेत्र आता राज्यातील प्रमुख तीर्थक्षेत्र म्हणून ओळखले जाऊ लागले आहे.काही काळ आपल्याला येथील सेवा करण्याची संधी मिळाली.त्या काळातही विकास कामांना चांगली दिशा देता आली. राज्याच्या सर्वांगीण आर्थिक प्रगतीमध्ये देवस्थानांचा मोठा वाटा असून,गेले काही वर्षां पासून पर्यटनाची भावना वाढत आहे.भौतिक सुख सुविधांपलीकडे लोकांकडून मनःशांती,सकारात्मक ऊर्जा व निवांतपणा शोधला जातो.मोहटा देवस्थान येथे अशा पद्धतीच्या वातावरणामुळे भाविकांचे मन अधिक प्रसन्न होते.श्रद्धायुक्त अंतकरणांनी केलेले सेवा कार्य आत्मविश्वास जसा वाढवते तसे चांगले कार्य करण्याची प्रेरणा देते.धार्मिक स्थळांमधून अशीच ऊर्जा मिळत असल्याने भाविकांचा ओढा वाढतो.माहूरच्या देवीचे स्वयंभू अंशात्मक स्थान म्हणून मोहटा देवीची ख्याती असल्याने देवी भक्तांमध्ये सुद्धा मोहटा गडाचे आकर्षण वाढत आहे.सोयी सुविधा वाढवताना परिसराची मूळ रचना अबाधित ठेवूनच कामे व्हावीत अशी अपेक्षा व्यक्त करत सर्व विकासकामांबाबत भिलारे यांनी समाधान व्यक्त केले.मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे यांनी आगामी काळातील विकास कामांची माहिती दिली.

# शिंगणापूर देवस्थानात चोरी?

## बनावट ॲप घोटाळा

### दोषींवर कठोर कारवाईची मागणी

**नेवासा । प्रतिनिधी**

शनि शिंगणापूर हे लाखो भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या देवस्थानात ऑनलाईन पूजा व तेल अर्पणासाठी बनवलेल्या अधिकृत ॲपऐवजी काही कर्मचाऱ्यांनी बनावट ॲप तयार करून भक्तांकडून कोट्यवधी रुपयांची देणगी उकळल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. या प्रकाराची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी भाजपा कार्यकर्ते विशाल सुरपुरीया यांनी केली आहे. पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांना दिलेल्या निवेदनात सुरपुरीया यांनी सांगितले की, या घोटाळ्यात देवस्थानमधील काही कर्मचारी व वरिष्ठ अधिकारी सामील असून त्यांनीच ही बनावट ॲप्स तयार करून भक्तांची फसवणूक केली आहे. त्यांनी दिलेल्या निवेदनासोबतच या ॲप्सचे तांत्रिक पुरावेही जोडले आहेत. यावेळी सिए गौरव गुगळे उपस्थित होते. सुरपुरीया यांनी नमूद केले की, शनैश्वर देवस्थानने ऑनलाइन पूजा व देणगीसाठी पूर्वी अधिकृत



ॲप तयार केले होते. परंतु, ते ॲप सध्या बंद आहे आणि त्याबाबत अधिकृत घोषणा झाली आहे. मात्र सध्या अनेक बोगस ॲप्स प्ले स्टोअरवर उपलब्ध असून, त्याचा वापर करून भक्तांकडून पूजा व तेल अर्पणासाठी प्रत्येकी ₹१५०० ते ₹२००० घेतले जात आहेत. या बोगस ॲप्सची संख्या दहा पेक्षा अधिक आहे. प्रत्येकी ॲपचे सदस्य सुमारे २ ते ३ लाखांपर्यंत असून, अंदाजे ₹४०० ते ₹५०० कोटी रुपयांची फसवणूक झाल्याचा अंदाज आहे. ही ॲप्स अजूनही सुरु असून त्याद्वारे भक्तांची लुट चालूच आहे. या प्रकारामध्ये देवस्थानमधील संबंधित कर्मचारी आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांची चौकशी करून त्यांच्यावर गुन्हे दाखल करावेत. तसेच त्यांच्या संपत्तीची आणि मालमत्तेची सखोल तपासणी करावी, अशी मागणी सुरपुरीया यांनी केली आहे. जर पोलीस प्रशासनाने त्वरित कारवाई केली नाही, तर या प्रकरणी उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे. या प्रकरणी लवकरच राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून त्यांच्याकडे न्याय मागणार आहे,असेही सुरपुरीया यांनी स्पष्ट केले.



# जनता विद्यालयात माजी विद्यार्थी मेळावा

**शेवगाव । शिवाजी घुगे**

रयत शिक्षण संस्थेच्या जनता विद्यालय, घोटण येथे इयत्ता १०वी (सन २००९-१०) च्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक भोसले सर होते. अनेक वर्षांनंतर जुने मित्र-मैत्रिणी भेटल्यामुळे सर्वत्र आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. विद्यार्थ्यांनी जुन्या आठवणींना उजाळा देत आपली मनोगते व्यक्त केली. शिक्षकांनी तळमळीने दिलेल्या शिक्षणामुळेच आम्ही विविध क्षेत्रांमध्ये यश संपादन करू शकलो, असे गौरवोद्गार यावेळी अनेक माजी विद्यार्थ्यांनी व्यक्त केले. माजी विद्यार्थ्यांनी विद्यालयातील आजी व माजी शिक्षकांचा सत्कार करून त्यांच्या बद्दल कृतज्ञता व्यक्त केली. या प्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक भोसले यांनी विद्यार्थ्यांनी आयोजित केलेल्या या उपक्रमाचे कौतुक करत, विद्यालयाबद्दल त्यांच्यात असलेल्या ऋणानुबंधाविषयी समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डुकरे यांनी विद्यार्थ्यांच्या पुढाकाराचे स्वागत करत, विद्यालयाच्या विकासासाठी सर्वांनी एकत्र येऊन कार्य करावे, असे आवाहन केले. या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन माजी विद्यार्थी परमेश्वर थोरवे, शिवाजी भोसले, नामदेव घनवट, स्वाती कटारिया, अश्विनी कर्डिले, नीलम दगडे, पूजा चंडावले यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावून पार पाडले. कार्यक्रमासाठी विद्यालयाचे माजी शिक्षक बोडखे, राठोड, तिवारी, सोनवणे, ढोले, गायकवाड, तोरडमल, संतोष कवडे, ससे, मोरे तसेच सध्या कार्यरत असलेले सर्व शिक्षक आणि माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन उज्वल धावणे यांनी केले, तर आभार प्रदर्शन ढाकणे एम. के. यांनी केले.

# कोपरगावात अजब निषेधाची घोषणा; बांगड्यांनी 'सौभाग्य' साजरे करणार!



**कोपरगाव । प्रतिनिधी**

कोपरगाव नगरपरिषद प्रशासनावर, विशेषतः अतिक्रमण विरोधी कारवाईतील दुजाभावाच्या आरोपांवरून एक रोखठोक, उपरोधिक आणि संतप्त स्वरूपाचे निवेदन प्रसिद्ध झाले. स्थानिक नागरिक संजय काळे यांनी मुख्याधिकाऱ्यांना उद्देशून लिहिलेल्या या पत्रात प्रशासनाच्या कामकाजावर गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. पत्रात त्यांनी सकाळी गोरगरीब हातगाडीधारकांवर अतिक्रमण पथकाची तत्पर कारवाई झाली असली तरी, शहरातील राजकीय नेते, गुंड प्रवृत्तीचे कार्यकर्ते यांच्या बेकायदेशीर फ्लेक्स, होर्डिंग्ज व अतिक्रमणांवर प्रशासन डोळेझाक करत असल्याचा आरोप केला आहे. काळे यांनी उपरोधिक भाषेत प्रशासनाच्या कार्यक्षमतेचे ''सौभाग्य'' मानून ता. ५ जून २०२५ दुपारी ४ वाजता नगरपरिषद कार्यालयात प्रत्यक्ष येऊन ''बांगड्या'' भेट देऊन हे सौभाग्य साजरे करणार असल्याची घोषणा केली आहे. त्यांनी पुढे म्हटले आहे की, ''आपण फक्त गरीबांचा कर्दनकाळ आहात, श्रीमंत आणि राजकीय गुंडांसमोर मात्र नांगी टाकता. हेच आमचे सौभाग्य!'' पत्रात उच्च न्यायालयाच्या आदेशांचा अवमान, रस्त्यावर लटकणाऱ्या अवैध फ्लेक्समुळे होणारे अपघाताचे धोके, शहराची विद्रूपता यावरही ताशेरे ओढण्यात आले आहेत. हा पत्रप्रपंच केवळ वैयक्तिक संताप नसून शहरातील प्रशासनाच्या कारभारावर जनतेच्या मनात असलेला रोष आणि असंतोष याचे प्रतीक मानले जात आहे. यावर नगरपरिषद प्रशासन काय प्रतिक्रिया देणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# देवाभाऊ कुस्ती स्पर्धा संत महंतांच्या उपस्थितीत उद्घाटन



**शेवगाव । लक्ष्मण मडके**

केसरी कुस्ती, जी महाराष्ट्रात अत्यंत लोकप्रिय आहे, ती एक पारंपरिक कुस्ती स्पर्धा आहे. या स्पर्धेत, कुस्तीगिरांना पारंपरिक पद्धतीने लढाई करावी लागते आणि जो जिंकतो, त्याला महाराष्ट्र केसरी हा किताब मिळतो. या बाबत सविस्तर वृत्त असे कि देवा भाऊ कुस्ती स्पर्धेचे आज बुधवार ता. ०४ जून रोजी शेवगाव मधील खंडोबा मैदानावर आयोजन करण्यात आले. या कुस्ती स्पर्धेचे उद्घाटन तारकेश्वर गडाचे महंत आदिनाथ महाराज शास्त्री, राम महाराज झिंजुर्के व रेणुकामाता मल्टीस्टेट चे चेअरमन अर्थतज्ञ डॉ. प्रशांत भालेराव यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाजपचे राज्य संघटक तथा मुख्य आयोजक अरुण मुंढे यांनी केले, त्यांनी यावेळी शेवगाव मध्ये कुस्ती स्पर्धा का? खेळल्या जाव्यात हे आपल्या प्रास्ताविकात सांगितले, त्यानंतर व्यासपीठावरील उपस्थित मान्यवरांचे स्वागत व सन्मान करण्यात आला. यावेळी ज्ञानेश्वर बटूळे महाराज, आरएसएसचे प्रमुख जगदीशशेठ धूत, विहीपचे तालुका प्रमुख ज्ञानेश्वर वंजारी, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे राज्य कार्यकारणी सदस्य नंदकुमार मुंढे, भाजपचे माजी तालुकाध्यक्ष तुषार वैद्य, अमोल सागडे, डॉ कुष्णा देहाडराय, एकनाथ कुसळकर, अंकुश कुसळकर, कडू मगर, कमलेश गांधी, दिगंबर काथवटे, माजी उपनगराध्यक्ष वजीरभाई पठाण, विनोद मोहिते, सालारभाई शेख, माऊली खेडकर, बाळासाहेब कोळगे, एकनाथ शिरसाठ, गणेश गर्जे, उदय मुंढे, सुनील जगताप, तालुका क्रीडा अधिकारी भाऊसाहेब वीर, माजी सैनिक तालुका अध्यक्ष मेजर विनोद शेळके, पप्पू केदार, अंकुश ढाकणे, सोमा मोहिते, अभिजित बडे, अंबूदादा मोहिते पहिलवान, कडूभाऊ मगर, प्रकाश चित्ते इत्यादी प्रमुख मान्यवर यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी पंधरा पंच, स्कोर बोर्ड प्रमुख बबन बेंद्रे मुख्य समालोचक हंगेश्वर धायगुडे सर, मुख्य पंच रवींद्र धोत्रे यांचा ही सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. निवेदक दिपक कुसळकर यांनी केले.

# धर्माचं पालन हेच खऱ्या जीवनाचं रक्षण- माधवबाबा

**पाथर्डी । प्रतिनिधी**

दैनंदिन जगण्याला धर्माचा आधार असेल, तरच जीवनातील अडथळे व धोके ईश्वरकृपेने टाळता येऊ शकतात. संत-महंतांनी साधना करत भाविकांचे कल्याण केले. विविध प्रकारच्या लीलाकार्यांतून धर्मविचारापासून दूर गेलेल्या लोकांना धर्माच्या चरणी आणले, असे मत शंकर महाराज मठाचे संस्थापक माधव बाबा यांनी व्यक्त केले. येथील शंकर महाराज मठामध्ये जेष्ठ शुद्ध अष्टमी निमित्त आयोजित भाविकांच्या मेळाव्यात ते बोलत होते. शहरातील उद्योजक आनंदकुमार चोरडिया यांच्या हस्ते महापूजा व महाआरती करण्यात आली. चोरडिया परिवारातर्फे भाविकांना महाप्रसाद देण्यात आला. जिल्ह्याच्या विविध भागांसह बीड, पुणे, संभाजीनगर, नाशिक अधिभागातून भाविक शंकर महाराज पूजा उत्सवाला उपस्थित होते. राज्यात फक्त पाथर्डीच्या मठातीलच शंकर महाराजांची मूर्ती काळ्या पाषाणाची असून, या मठामध्ये शंकर महाराजांनी वापरलेला लोखंडी पलंग भाविकांच्या दर्शनासाठी उपलब्ध आहे. त्यामुळे राज्यातील शंकर महाराज भक्तांसाठी पाथर्डीचा मठ म्हणजे मोठे श्रद्धास्थान आहे. माधव बाबा म्हणाले, दत्त संप्रदायातील प्रमुख सर्वच संत-महंतांनी जनकल्याणासाठी अवतार घेत, देशभर भ्रमंती करत भाविकांना धर्ममार्गाला लावले. शंकर महाराजांच्या लीला गूढ व अनाकलनीय असून, साधनामार्गात आल्यावर याची उकल होते. महाराजांच्या बावनीमध्ये वृद्धेश्वराचे स्थान महत्त्वाचे असून, शंकर महाराजांनी नाथ संप्रदायाच्या



परंपरेप्रमाणे ''अलख'' अशा शब्दात भगवान शंकराला आवाज दिला. त्यावेळी वृद्धेश्वराची पिंड सुद्धा जमिनीमधून वर आली. एवढा अधिकार असणाऱ्या अवतारी संताने पाथर्डी तालुक्याला मोठ्या भाग्याचा आशीर्वाद दिला आहे. मिरी मढी, तिसगाव, वृद्धेश्वर, पाथर्डी अशा पट्ट्यामध्ये त्यांचे काही काळ वास्तव्य राहिल्यामुळे ही सर्व गावे पवित्र झाली आहेत. विविध संतांच्या पदस्पर्शाने व नाथ संप्रदायाच्या स्थापनेच्या भूमीला म्हणजे पाथर्डी तालुक्याला, 'देवभूमी' म्हणून ओळखले जाते. या देवभूमीत जन्म घेण्यासाठीसुद्धा पूर्वजन्मीची पुण्याई लागते. प्रत्येक व्यक्तीला तिच्या जन्माबरोबरच धर्म जोडून आलेला असतो. ईश्वराने धर्मकार्यासाठी पुन्हा जन्म दिला, याची जाणीव ठेवूनच प्रत्येकाने धर्ममार्गाची कास धरून स्वतः सह समाजाचे कल्याण साधावे. निव्वळ भोगवादी प्रवृत्ती म्हणजे असुरी वृत्ती असून, भोगलालसेतून मनुष्याचे अधःपतन होते. ही प्रवृत्ती रोखण्यासाठीच संत उद्धाराचे कार्य करतात. वारकरी संप्रदाय व नाथ संप्रदाय यांचे नाते बंधुत्वाचे आहे. दत्त संप्रदाय हे अशा सर्व संप्रदायांचे अग्रस्थानी आहे. हजारो वर्षे तपश्चर्या करत साधू-संतांनी तालुक्याची भूमी पवित्र केली आहे. दैनंदिन जीवनातून धर्म बाजूला केल्यास माणसाचे आयुष्य पशुसमान ठरते. प्रत्येकाने आपल्या धर्माचेच आचरण केले पाहिजे. जगाच्या पाठीवर कुठेही गेलं, तरी कल्याणासाठी धर्मच उपयोगी ठरतो. आपल्या प्रत्येक श्वासावर ईश्वराने ईश्वरी संदेश लिहिलेला आहे. ज्या दिवशी कोरा श्वास निघेल, त्या दिवशी आपली इहलोकी यात्रा संपल्याचे समजावे. शंकर महाराजांच्या उपासनेतून लाखो भाविकांनी प्रचिती घेतली असून, या सेवाकार्यामुळे दैनंदिन जीवनामध्ये सर्व संकटांचा सामना करण्याची शक्ती आपोआप प्राप्त होते. येणारा काळ अत्यंत अनिष्ट असून, मनुष्यसमूहासाठी मोठी आव्हाने घेऊन येत आहे. ती पेलण्यासाठी आपल्या श्रद्धास्थानावर अधिकाधिक साधना करा. वैश्विक कल्याणाच्या भावनेने केलेली साधना ईश्वराकडून लवकर स्वीकारली जाते, असेही माधव बाबा यांनी शेवटी सांगितले. कालिका देवी मंगल कार्यालयात सर्वांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती.

# जागतिक पर्यावरण दिन

आज ५ जून, आजचा दिवस जगभरात जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा केला जातो. मागील दोन अडीच शतकात विशेषतः औद्योगिक क्रांती नंतर जागतिक हवामान बदल आणि इतर नुकसानकारक बदल लक्षात घेता पृथ्वीचे आयुर्मान, सहज, स्वाभाविक आणि निसर्गनियमानुसार असावे या उद्देशाने संयुक्त राष्ट्र संघात (युनो) ५ ते १५ जून १९७२ दरम्यान एक संमेलन झाले. यात संयुक्त राष्ट्र संघाच्या आमसभेने संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम यावर सखोल चर्चा केली. त्यात मानवी हस्तक्षेपामुळे पर्यावरणाचे होत असलेले नुकसान आणि त्याचा मानवी जीवनावर होणारे विपरीत परिणाम यावर सखोल चर्चा होऊन काहीतरी गंभीर पावले उचलली पाहिजे यावर एकमत झाले. याच संमेलनात संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम United Nations Environment Program (UNEP) चा जन्म होऊन दरवर्षी ५ जून हा दिवस जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा करण्याचे ठरवण्यात आले, यामुळे लोकं, सरकार आणि समाजात पर्यावरण विषयक जनजागृती करता येईल.



याच संमेलनात भारताच्या तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी पर्यावरणाची बिघडती जागतिक परिस्थिती आणि त्याचा जगाच्या भविष्यावर होणारा प्रभाव या विषयावर प्रभावी भाषण दिले आणि समतोल पर्यावरणाचे महत्व विशद केले. आंतरराष्ट्रीय पर्यावरण विषयक स्तरावर हे भारत सरकारचे पहिले महत्वाचे पाऊल होते. पुढील वर्षी म्हणजे १९७३ मध्ये धरती हा विषय घेऊन मोजक्या संकल्पनेसहित हा दिवस साजरा करण्यात आला. १९७४ मध्ये जगातील विविध शहरात हा दिवस अत्यंत उत्साहाने साजरा करणे सुरू झाले आणि तिथून पुढे संपूर्ण जगभर दरवर्षी ५ जून हा दिवस जागतिक पर्यावरण दिन म्हणून संपूर्ण आत्मीयतेने साजरा केला जातो. दरवर्षी सुमारे १५० देश हा दिवस साजरा करतात आणि दरवर्षी वेगळा देश हा उपक्रम जागतिक स्तरावर आयोजित करतो. जागतिक परिस्थिती, अन्न, पाणी, दुष्काळ, तापमान वाढ, हवामान बदल आणि त्याचे विपरीत परिणाम, मानवी जीवन आणि भविष्य, या सर्वांवर जनजागृती म्हणून हा दिवस साजरा केला जातो. त्यासाठी दरवर्षी एक नवी थीम निवडून त्यासंदर्भात कार्य केले जाते. त्यासाठी मग विविध देशानी पर्यावरण संबंधित पशु, पक्षी प्राणी आणि जंगल संवर्धन करण्यासाठी वेगवेगळे कायदे केले. २०२० साली कोलंबियाने या दिवसाचे आयोजन केले होते. २०२१ साली पाकिस्तान या जीवन परिवर्तन उपक्रमाचे यजमान होते . २०२२ साली स्वीडन हा देश या दिवसाचा आयोजक होता. फक्त आणि फक्त पृथ्वी ही त्या वर्षीची थीम होती. २०२३ साली आयव्हरी कोस्ट हा देश या दिवसाचा आयोजक होता प्लास्टिक प्रदूषणावर उपाय ही त्या वर्षीची थीम होती. त्या दिवशी विविध देशांमध्ये अंतर्गत परिस्थितीत पर्यावरणविषयी होणाऱ्या दुष्परिणामांची जाणीव करून दिली गेली. २०२० आणि २०२१ साली जगावर कोरोना महामारीचे संकट असल्याने हा कार्यक्रम सार्वजनिकरित्या साजरा न करता ऑनलाइन साजरा केला गेला. मागील वर्षी म्हणजे २०२४ साली आपली जमीन आपले भविष्य : जमीन पुनर्संचयित करणे, वाळवंटीकरण रोखणे आणि दुष्काळ प्रतिरोधकता या थीम खाली साजरा केला गेला. या थीमचा उद्देश जमीन पुनर्संचयित करणे वाळवंटीकरण रोखणे आणि दुष्काळाच्या परिणामांना तोंड देण्यासाठी सक्षम राहणे हा होता. मागील वर्षी सौदी अरेबिया हा जागतिक पर्यावरण दिनाचा आयोजक होता. या वर्षी म्हणजे २०२५ साली दक्षिण कोरिया जागतिक पर्यावरण दिनाचा आयोजक असून प्लास्टिक प्रदूषण थांबवा ही यावर्षीची थीम आहे. या थीमचा संदेश आहे की प्लास्टिक प्रदूषणाला आळा घालण्यासाठी जागतिक स्तरावर एकत्र येऊन काम करणे. UNEP नुसार पप्लास्टिक प्रदूषण ही गंभीर समस्या बनली आहे, जी पर्यावरणास आणि मानवी आरोग्यास धोकादायक आहे. आजच्या दिवसाचे औचित्य साधून जगभर प्लास्टिक प्रदूषण आणि त्याचे दुष्परिणाम याबद्दल लोकांना जागृत करण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार आहे. जगभरातील लोकांनी या दिवशी पर्यावरणाचे जतन करुन मानवी भविष्य सुरक्षित करण्याचा संकल्प केल्यास आणि प्लास्टिक मुक्तीचा ध्यास घेतल्यास या दिवसाचे सार्थक होईल. जागतिक पर्यावरण दिनाच्या सर्वांना शुभेच्छा!




**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५
**समाजसंवाद**

# कक्कय्या समाज महासंघाचे ८ जून रोजी कार्यकर्ता मार्गदर्शन शिबीर

**मुंबई । दत्ता खंदारे**

समस्त कक्कय्या समाज महासंघ यांच्या २०२५ या रौप्य महोत्सवी वर्षाचे मंगलमय औचित्य साधून कार्यकर्ता मार्गदर्शन शिबीर आणि सामाजिक मंडळाच्या चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले आहे.सदर चर्चा सत्राचे आयोजन ८जून २०२५रोजी मुंबईत करण्यात आले आहे. यावेळी ढोर व कक्कया समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी संपूर्ण महाराष्ट्रात कार्यरत असलेल्या संघटना / मंडळे / संस्था / फाऊंडेशन इत्यादींच्या पदाधिका-यांना उपस्थित राहून चर्चा सत्रात भाग घेण्यासाठी विनंती करण्यात आली आहे.

सदर कार्यक्रम रविवार ता. ८ जून २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता राजर्षि शाहू महाराज सभागृह, ३रा मजला, (छत्रपती शिवाजी महाराज नाटयगृहाच्या) न. चि. केळकर रोड, दादर (प), मुंबई-४०००२८, येथे करण्यात आले आहे. या चर्चा सत्रात पुढील विषयावर विचार मंथन करुन पुढील दिशा ठरविण्यात येणार आहे.




२०२५ या मंगलमय रौप्य महोत्सवी वर्षाचा भव्य दिव्य सोहळा साजरा करणे.२०२५ ची मंगलमय रौप्य महोत्सवी ''स्मरणिका '' काढणे.२०२५ या मंगलमय रौप्य महोत्सवी वर्षा निमित्त महाराष्ट्र, कर्नाटका, आंध्र, गुजराथ इ. राज्य व देश पातळी वरील कक्कय्या ढोर समाजाचे मुंबई येथे ऑक्टोंबर, नोव्हेंबर २०२५ मध्ये भव्य दिव्य अधिवेशन घेणे. संत शिरोमणी विरशैव कक्कया महाराजांचा पुर्णाकृती पुतळयासह भव्य स्मारक मुंबई येथे बांधून देणे. तत्कालीन मुख्यमंत्री, एकनाथ शिंदे यांनी संत कक्कय्या आर्थिक विकास महामंडळ या समाजासाठी देऊ अशी अधिवेशनात घोषणा केली होती. त्या घोषणेची अंमलबजावणी शासन निर्णय पारित करून अद्याप झालेली नाही.

ती त्वरीत करण्यात यावी. ढोर कक्कय्या समाजातील थोर स्वातंत्र सेनाने, हरियाणा व उत्तर प्रदेशचे तत्कालीन राज्यपाल आणि मुंबई प्रांताचे मंत्री स्वर्गीय गणपतरावजी देवजी तपासे साहेब यांचे देशासाठी मौलीक योगदान असल्याने त्यांचे स्मारक शासनातर्फे उभारण्यात यावे. देशाच्या पहिल्या हंगामी लोकसभेचे खासदार आणि नंतर सलग तीन वेळा खासदार म्हणून निवडून आलेले तसेच आमदार कै. तायप्पा हरि सोनावणे हे ढोर कक्कय्या समाजाचे प्रतिनिधी होते. व त्यांनी युनो मध्ये शासनाचे प्रि केले होते. अशा लोक नेत्याचे स्मारक शासनातर्फे उभारण्यात यावे. माजी आमदार, लेखक, नाटककार, दिग्दर्शक, निर्माते, साहित्यीक, चित्रपट कलाकार तसेच दलित मित्र पुरस्काराने गौरवण्यात आलेले स्वातंत्र सैनिक, समाज सुधारक, स्वर्गीय नामदेव व्हटकर. कै. नामदेव व्हटकर हे ढोर कक्कय्या समाजाचे लोकप्रिय नेते असून सुध्दा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण यात्रेचे संपूर्ण चित्रीकरण त्यावेळचा अतिशय विपरित काळामध्ये केले. यासाठी पैसा अडका नसल्याने स्वत:चा प्रिन्टींग प्रेस गहाण ठेऊन कर्ज काढले व असे महान कार्य केले. कै. मा. आमदार गणपत सोनवणे हे सलग सन १९५२ ते १९६७ असे ३ वेळेस आमदार होते.त्यांचे कार्य समाजासाठी मौल्यवान होते. या सर्वांचे स्मारक उभारून नव्या पिढीला याची जाणीव करुन देण्यासाठी, समाज पुन्हा एकत्रित आणण्यासाठी,आदी विषयावर चर्चा आणि विचार मंथन होणार असून यासाठी संत कक्कय्या समाजातील बांधवानी मोठया संख्यने उपस्थित राहून यात आपला सहभाग नोंदवावा असे समस्त कक्कय्या महासंघ यांच्या वतीने अध्यक्ष निवृत्ती सावळकर, कार्याध्यक्ष मारुती सदाफुले,सरचिटणीस प्रकाश दरवेशी यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

# पावसाने झालेल्या नुकसानीचे ८० टक्के पंचनामे पूर्ण, उर्वरीत ४ दिवसांत करण्याच्या सुचना

## जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांचा पाथर्डी दौरा

**पाथर्डी । नितीन गटाणी**

अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे सुमारे ८० टक्के भागांचे पंचनामे झाले आहेत.उर्वरित पंचनामे आगामी चार दिवसांमध्ये होतील. धार्मिक पर्यटनाच्या दृष्टीने हा तालुका महत्त्वाचा असून भाविकांसाठी विविध योजना राबवण्यात येतील. तसेच केंद्र व राज्य शासनाच्या लोक कल्याणकारी योजना शहरी व ग्रामीण भागामध्ये प्रभावीपणे राबवण्यात याव्यात. अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांनी सर्व विभाग प्रमुखांना दिल्या.



जिल्हाधिकारी पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर प्रथमच डॉ. आशिया यांनी पाथर्डी तालुका दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी तहसील कार्यालयामध्ये सर्व विभागांचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी प्रांताधिकारी प्रसाद मते,तहसीलदार उद्धव नाईक,मुख्याधिकारी संतोष लांडगे,अतिरिक्त पोलीस निरीक्षक शिवाजी तांबे,सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता राहुल कांबळे,कृषी अधिकारी महादेव लोंढे,वनाधिकारी अरुण साबळे,तालुका आरोग्य अधिकारी डॉ.भगवान दराडे,वैद्यकीय अधीक्षक डॉ.सचिन दरंदले,महिला बालकल्याण विभागाच्या अंजली आहेर आदी विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी डॉ.आशिया यांनी सर्व विभागांचा सविस्तर आढावा घेताना काही सूचना देखील केल्या. प्रामुख्याने केंद्र व राज्य सरकारच्या योजना तळागाळापर्यंत पोहोचवा. धार्मिक पर्यटनाच्या दृष्टीने देखील या तालुक्याला वेगळे महत्त्व आहे.यापेक्षाही अधिक वेगळ्या प्रकारच्या सुविधा भाविकांना मिळाव्यात यासाठी पालकमंत्री व इतर लोकप्रतिनिधींच्या सोबत चर्चा करून जिल्हा नियोजन मधून निधी उपलब्ध करून देणे संदर्भात प्राधान्य दिले जाईल. अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्याचे काम सुरू असून उर्वरित पंचनामे आगामी चार दिवसांमध्ये केले जातील.आज आपण तालुक्याला प्रथमच भेट दिली असून विविध विभागांना कामकाजाबाबत सूचना केल्या आहेत.पुढील वेळी तालुका दौऱ्यावर आल्यानंतर केलेल्या सूचनांच्या अंमलबजावणीचा पुन्हा आढावा घेऊ. असे जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी सांगितले.यानंतर पाथर्डी नगरपरिषदेच्या नूतन इमारतीला त्यांनी भेट देऊन पाहणी केली.

# 'आयएमएस'चे प्रा. विजय शिंदे यांचा 'महाराष्ट्र शिक्षा भूषण' पुरस्काराने गौरव

**मुंबई । प्रतिनिधी**

'जागृती ड्रीम्स ऑफ यंग माइंड्स फाऊंडेशन' व 'इस्रो'च्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'मिशन राष्ट्र शिक्षा भूषण पुरस्कार २०२५' सोहळ्यात अहमदनगर जिल्ह्यातील प्रा. विजय शिंदे यांना 'महाराष्ट्र शिक्षा भूषण' पुरस्काराने गौरविण्यात आले. हा कार्यक्रम नुकताच मुंबई येथे पार पडला. पुरस्काराचे वितरण चेतना पब्लिकेशनचे विभागीय संचालक राज शर्मा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अजय चौबे, स्नेहालय शाळेच्या मुख्याध्यापिका वीणा मुंगी, तसेच विवेकानंद शाळेच्या कांचन पापडेजा प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. प्रा. विजय शिंदे हे पारगाव येथील डॉ. शरद कोलते इंग्लिश मिडियम स्कूलमार्फत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी उल्लेखनीय शैक्षणिक कार्य करत असून, आरोग्य शिबीर, महिला व युवकांसाठी उद्योजकता मार्गदर्शन, वृक्षारोपण, कौशल्य विकास अशा विविध उपक्रमांमधून समाजोपयोगी कार्य करत आहेत. या सर्व कार्याची दखल घेऊन त्यांना हा मानाचा पुरस्कार देण्यात आला.



लवकरच शाळेमध्ये 'वैशाली कोलते कौशल्य विकास केंद्रा'ची स्थापना होणार असून त्याद्वारे स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. तसेच शाळेसाठी डॉ. नितीन कोलते यांनी चिंचा फोडणी मशीनची सुविधा उपलब्ध करून दिली आहे, ज्यातून होणारे उत्पन्न शाळेच्या विकासासाठी वापरण्यात येणार आहे. प्रा. विजय शिंदे हे भा.पां. हिवाळे शिक्षण संस्थेच्या आयएमएस महाविद्यालयात सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. ते अनेक सामाजिक व शैक्षणिक उपक्रमात सक्रीय असून त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून हा पुरस्कार महत्त्वपूर्ण मानला जात आहे. या यशाबद्दल डॉ. एम.बी. मेहता (संस्थेचे संचालक), डॉ. विक्रम बार्नबस (उपसंचालक), डॉ. प्रोनोती तेलोरे (विभागप्रमुख), डॉ. शरद कोलते, शिवाजी टेमकर (निवृत्त महसूल अधिकारी), वसंत दिवटे, उद्योजक शहाजी मोरे, तसेच परिसरातील नागरिक व कुटुंबीयांनी प्रा. शिंदे यांचे हार्दिक अभिनंदन केले आहे.

# शनीदर्शन रात्री बंद होणार; ११ जूनपासून नवा निर्णय

## स्थानिकांसाठी असणार स्पेशल गावकरी गेट

**नेवासा । विजय खंडागळे**

तालुक्यातील श्रीक्षेत्र शनिशिंगणापूर येथील शनी देवाचे रात्रीचे दर्शन ११ जून २०२५ पासून बंद ठेवण्याचा निर्णय शनैश्वर देवस्थान प्रशासनाने घेतला. रात्री १०.३० ते पहाटे ४ या वेळेत भाविकांना दर्शन मिळणार नाही, असे देवस्थानचे अध्यक्ष भागवत बानकर यांनी स्पष्ट केले.

ता. २७ मे रोजी झालेल्या विश्वस्त मंडळ व ग्रामस्थांच्या संयुक्त बैठकीत हा निर्णय घेण्यात आला असून, स्वच्छता व सुरक्षिततेच्या कारणास्तव ही पावले उचलण्यात आली आहेत. मात्र गुढीपाडवा, शनि अमावस्या, व शनि जयंती या विशेष उत्सवांदरम्यान मंदिर २४ तास भाविकांसाठी खुले राहणार आहे. ग्रामस्थांसाठी वेगळा दरवाजा ११ जूनपासून पहाटे ४ ते सकाळी ९ व सायंकाळी आरतीपूर्वी अर्धा तास आणि आरतीनंतर एक तास या वेळेत, ग्रामस्थांना



गावकरी गेट (दक्षिणेकडील गेट) मधून आधार कार्ड दाखवून दर्शनासाठी प्रवेश दिला जाणार आहे. मात्र, त्यांच्यासोबत येणाऱ्या इतर व्यक्तींना परवानगी नसेल. नवे नियम आणि संतापाचा सूर : शनी मंदिर परिसरातून भिकाऱ्यांना हटवण्याचा तसेच पूजेचे साहित्य व विधींबाबत मार्गदर्शक फलक लावण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. दरम्यान, शनिशिंगणापूर पोलीस ठाण्यासमोर व परिसरातील लटकूंवर व भाविकांच्या गर्दीवर नियंत्रण ठेवण्यात पोलीस असमर्थ ठरत असल्याने ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला.

## रयत समाचार वर्धापन दिनानिमित्त शिवराजाभिषेक दिन

# रयत कृतज्ञता गौरव सोहळा

नमस्कार,

गेल्या १३ वर्षांपासून माहिती, ज्ञान, मनोरंजन, प्रबोधन या क्षेत्रात कार्यरत असलेला आपला लाडका रयत समाचार ६ जून राजाभिषेक दिनापासून नविन रूपात वाचकांसमोर येत आहे. माध्यमांच्या काळानुसार बदललेल्या शैलीत आम्ही सतत सामान्य रयत वाचकांसोबत रहाण्याचा प्रयत्न करत आहोत. रयत समाचार म्हणजेच छत्रपती शिवरायांच्या रयतेच्या हितासाठी मनोरंजनासह प्रबोधनासाठी कटीबध्द असलेल्या माणसांचा समुह.

रयत समाचारचा शिवराजाभिषेक दिनी ६ जून रोजी वर्धापनदिनानिमित्त 'रयत कृतज्ञता गौरव सोहळा' आयोजित करण्यात आला असून यावेळी मुळचे श्रीरामपूर, अहमदनगर जन्मभूमी असलेले व गोवा, पुणे, मुंबई येथे इंग्रजी, मराठी पत्रकारीता केलेले जुन्या-नव्या पिढीला जोडणारे आमचे मार्गदर्शक ज्येष्ठ पत्रकार कामिल पारखे यांचा गौरव ज्येष्ठ पत्रकार ह.भ.प. श्यामसुंदर महाराज सोन्नर यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सीएसआरडीचे संचालक डॉ. सुरेश पठारे तर प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ संपादक सुभाष गुंदेचा, शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या खेळाडू कोमल वाकळे आदींच्या उपस्थितीत होणार आहे. तरी आपण आवर्जून यावे. हे घरचे आमंत्रण असल्याने हक्काने यावे. आपल्या सर्वांचे आशिर्वाद आहेतच. प्रेम वृध्दींगत व्हावे.

हस्ते



ह.भ.प. श्यामसुंदर महाराज सोन्नर
ज्येष्ठ पत्रकार

सन्मान



कामिल पारखे
ज्येष्ठ पत्रकार

**अध्यक्ष**
डॉ. सुरेश पठारे
संचालक, सी.एस.आर.डी.-आय.एस.डब्ल्यू.आर

**प्रमुख पाहुणे**
सुभाष गुंदेचा
ज्येष्ठ संपादक, नवा मराठा

कोमल वाकळे
शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या खेळाडू

**परिसंवाद - माध्यमे आणि अखंड भारत : राष्ट्रीय एकात्मतेची भुमिका**

**शुक्रवार, ता.६ जून २०२५ रोजी सकाळी ११ वाजता.**

**ठिकाण : पत्रकार भवन सभागृह, पत्रकार चौक, मनमाड रोड, अहिल्यानगर (अहमदनगर)**

- विनित -

भैरवनाथ वाकळे, असिफखान दुलेखान, राजेंद्र देवढे, प्रभाकर ढगे, श्रीकांत काकतीकर, दिपक शिरसाठ, मोहसिन शेख, संध्या मेढे, मरयम सय्यद, आबिदखान, संतोष गायकवाड, पंकज गुंदेचा, तुषार सोनवणे, समी सय्यद, विजय केदारे, दत्ता वडवणीकर, अतुल देठे, दिगंबर भोसले